# प्रकरण ८ पोलीस दले

देशांतर्गत शांतता व सुरक्षा राखण्यासाठी विविध प्रकारची पोलीस दले अस्तित्वात आहेत. त्यांत प्रामुख्याने भारतातील प्रत्येक घटक राज्याचे स्वतंत्र पोलीस दल असते. त्यांच्याच जोडीला राज्यात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास, सार्वत्रिक निवडणुका, सण, उत्सव आणि नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात नागरी प्रशासनास कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यासाठी इतर पोलीस दले मदत करत असतात. त्यात मुख्यत: खालील काही दलांचा समावेश असतो.

**अ) केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) :** केंद्रीय राखीव पोलीस दल हे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करणारे सर्वांत मोठे निमलष्करी दल आहे. याची स्थापना १९३९ मध्ये झाली. या दलाचे प्रमुख 'महानिदेशक केंद्रीय राखीव पोलीस' हे असतात. या दलाने गौरवशाली सेवा दिली आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या एकूण २४० बटालियन्स असून त्यात सहा महिला बटालियन्स आहेत. त्या देशाच्या विविध भागांत कार्यरत आहेत.

**कार्य :**

(१) देशांतर्गत अस्थिरता निर्माण झाल्यास किंवा राज्यात व केंद्रशासित प्रदेशात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामात गरजेनुसार कार्य करणे.

(२) नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांना मदत करणे.

(३) देशद्रोह्यांच्याविरुद्ध संघर्ष करून त्यांचा बीमोड करणे.

(४) युद्धकाळात संरक्षण दलाच्या मदतीकरिता दुय्यम संरक्षणाचे काम करणे इत्यादी.

**ब) राज्य राखीव पोलीस दल (SRPF):** राज्य राखीव पोलीस दल हे भारतातील प्रत्येक राज्यातील गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली सामान्य पोलीस दलाव्यतिरिक्त सशस्त्र पोलीस दल आहे. त्यालाच राज्य राखीव पोलीस दल किंवा एस आर पी एफ तर काही राज्यात प्रांतीय रक्षक दल या नावाने ओळखले जाते. या दलाचे प्रमुख डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल आर्मड पोलीस हुद्द्याचे अधिकारी असतात. राज्य राखीव पोलीस दलात त्या-त्या राज्यातून भरती केली जाते. प्राथमिक व विशिष्ट प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना जबाबदारीची कामे दिली जातात. राज्यात कायम स्वरूपी छावण्यांमधून त्यांचे प्रशिक्षण सुरू असते. युद्ध काळात त्यांना दुय्यम संरक्षणाची कामे करावी लागतात.

**कार्य :**

(१) उपद्रवी व समाजकंटक गटांचा बंदोबस्त करणे.

(२) राज्यातील पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करणे.

(३) समाजघातकी, नक्षलवादी यांसारख्या सशस्त्र टोळ्यांचा बंदोबस्त करणे इत्यादी.

**क) गृहरक्षक दल (होमगार्ड):** होमगार्ड हे एक स्वयंसेवी संघटन आहे. याची स्थापना १९४८ मध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली विविध राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात झाली आहे. यात समाजातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा सहभाग असतो. त्यांच्या अनुभवाचा फायदा संघटनेला मिळतो. होमगार्ड ही ऐच्छिक सेवा आहे. नागरी व्यवस्थापनाला मदत करणारी संघटना म्हणून होमगार्डकडे पाहिले जाते. राज्याच्या होमगार्ड कायदा व नियमांप्रमाणे होमगार्डचे व्यवस्थापन व संघटन सुरू असते. होमगार्ड संघटनेच्या प्रमुखास 'कमांडंट जनरल होमगार्ड' असे म्हणतात. ही संघटना जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावर कार्य करते. त्या-त्या विभागातून होमगार्डची भरती केली जाते. त्यात पुरुष व महिला स्वयंसेवकांचा समावेश असतो. त्यांची शहरी व ग्रामीण अशी वर्गवारी केली जाते. त्यानुसार त्यांना सलग १० ते ४२ दिवसांचे प्राथमिक प्रशिक्षण दिले जाते. तसेच साप्ताहिक कवायत आणि आठ दिवसांचे उजळणी शिबिर पूर्ण करावे लागते.

**कार्य :**

(१) राज्यात व केंद्रशासित प्रदेशात कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण, जनसंपत्तीचे रक्षण या कामी सहकार्य करणे.

(२) सामाजिक कल्याणाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे.

(३) सण व उत्सव, मिरवणुका, सभा आणि निवडणुका या दरम्यानच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यास नागरी प्रशासनास मदत करणे.

(४) नैसर्गिक आपत्ती किंवा देशांतर्गत होणारे बॉंबस्फोट, दंगली इत्यादी प्रसंगी जनतेस मदत करून लोकांचे मनोधैर्य कायम राखण्यास मदत करणे.

(५) जातीय सलोखा निर्माण करून समाज भयमुक्त करण्याच्या कामात सहभागी होणे इत्यादी.

**ड) नागरी संरक्षण (Civil Defence) :** शत्रूच्या हवाई हल्ल्यांपासून आपल्या देशातील जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी जी संघटना बचाव कार्य करते त्या संघटनेला नागरी संरक्षण संघटना असे म्हणतात. आकाराने मोठ्या असलेल्या भारतात नागरी संरक्षण ही प्रत्येक राज्य शासनाची जबाबदारी आहे. नागरी संरक्षण संघटनेचे धोरण, नियंत्रण व कार्यवाही संपूर्ण देश पातळीवर होणे आवश्यक असते. ती जबाबदारी 'महानिदेशक नागरी संरक्षण' यांची असते तर राज्यात 'निदेशक नागरी संरक्षण' यांची जबाबदारी असते.

नागरी संरक्षण सेवेची रचना केंद्र, राज्य व जिल्हा अशी त्रिस्तरीय असते. त्या-त्या पातळीवर त्याचे कार्य सुरू असते. यात संरक्षण सेवेतील निवृत्त अधिकारी, सार्वजनिक संघटनेचे नेते, औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी, पोस्ट, टेलिग्राफ सेवेतील अधिकारी, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, तंत्रज्ञ यांचा समावेश असतो.

**कार्य :** शत्रूने केलेल्या हवाई हल्ल्यातून जीवित व वित्तहानी होऊ नये. यासाठी नागरी संरक्षण संघटना पुढीलप्रमाणे कार्ये करत असते.

(१) शत्रूने फेकलेले बॉंब निकामी करणे.
(२) सूचना यंत्रणा राबवणे.
(३) प्रकाशबंदी करणे.
(४) जखमींना वैद्यकीय मदत करणे.
(५) आग विझवणे.
(६) संपत्तीचे रक्षण करणे.
(७) सैनिक कल्याण केंद्राची स्थापना करणे इत्यादी.

## उपक्रम

**(१) पोलिसाची मुलाखत घ्या.**

(अ) पोलिसाचे नाव व हुद्दा

..........................................................................................................

(ब) सध्या कार्यरत पोलीस ठाणे व विभाग

..........................................................................................................

..........................................................................................................

(क) सेवा कालावधी

..........................................................................................................

..........................................................................................................

(ड) शिक्षण-प्रशिक्षण

..........................................................................................................

..........................................................................................................

(इ) सेवा काळातील अनुभव

..........................................................................................................

..........................................................................................................

(ई) तरुणांना काय संदेश?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

२. जवळच्या पोलीस ठाण्यास क्षेत्रभेट देऊन तेथील कामकाजाची माहिती मिळवा व ती येथे लिहा.

7XT69L